शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचा पुरस्कार करणारे साप्ताहिक

# प्राजक्त

संस्थापक व आद्य संपादक : स्व. पुरुषोत्तम कुलकर्णी

आम्ही भिडे
नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान
(खाजगी वितरण)
अंक २४ वा जुलै २०१५
त्रैमासिक क्र. २
Website : www.bhidekul.in
Email : office@bhidekul.in

वर्ष : ४४ अंक : २६ फोन ०२३१-२५४०४२७ कोल्हापूर ता. २४ ऑगस्ट २०१५ किंमत २ रुपये Reg. No. GR/RNP/KLP 136/15-17 Posted in Kolhapur RMS

## भिडे कुल संमेलन - २०१६

कळविण्यास आनंद वाटतो की, दि. २३ शनिवार आणि दि. २४ रविवार २०१६ या दोन दिवशी पुढील वर्षीचे भिडे कुल संमेलन नाशिक पिंपळगाव (बसवंत) या ठिकाणी, म्हणजे नाशिक पासून फक्त १५ ते २० कि. मी. अंतरावर असलेल्या आशीर्वाद मंगल कार्यालय या श्री. विजयसिंहजी व सौ. अलका भिडे यांच्या प्रशस्त वास्तूत संपन्न होत आहे. तरी आपण सर्व भिडे कुल/बंधू/भगिनी आणि माहेरवाशिणींनी अवश्य उपस्थित राहावे.


खरे तर २०१५ मध्येच नाशिक येथे संमेलन घ्यायचे ठरले होते. परंतु काही तांत्रिक अडचणींमुळे आपण नाशिकचे ऐवजी संगमेश्वर (रत्नागिरी) येथे ते संपन्न केले. संगमेश्वरच्या श्री. अनिलराव, मनोहरशेठ, प्रभाकर, प्रसाद, ॲड. मुकुंदराव, उर्मिलाताई, सुधीर व शेखर इत्यादी संगमेश्वर ग्रामस्थ भिडे मंडळींनी उत्स्फुर्त सहभाग घेऊन ते यशस्वी केले. हे आपणा सर्वांना ज्ञात आहे. संगमेश्वर संमेलनाच्या शेवटच्या सत्रात नाशिकच्या सौ. व श्री. विजयसिंहजी भिडे या उभयतांनी विशेष प्रतिक्रिया देवून पुढील संमेलन नाशिक येथेच घ्यायचे असे उत्स्फुर्तपणे सांगितले. त्याच वेळेस चिपळून भिडे मंडळींनी सुद्धा २०१६ मध्ये चिपळूण येथे संमेलन घेण्यास उत्सुकता दाखविली. या सर्व मंडळींना प्रतिष्ठान मन:पूर्वक धन्यवाद देते.

१ व २ मे २०१५ रोजी कार्यकारिणी पदाधिकारी व सदस्य अशा ८ ते १० भिडे मंडळींनी संमेलन स्थळी भेट दिली आणि सर्वांनाच नाशिक पिंपळगाव (बसवंत) येथील निसर्गरम्य वातावरण, भव्य जागा, प्रशस्त आणि स्वच्छ खोल्या, जेवणाची व्यवस्था, हिरवळीचे भव्य मैदान, खेळती हवा या दृष्टीने हा परिसर भावला. आमच्या दृष्टीने त्या संमेलनाकरिता येथील डॉर्मेटरी व्यवस्था ही बाहेरच्या हॉटेलच्या रूमसपेक्षा सरस आहे हे आवर्जून नमूद करावेसे वाटते. म्हणून संमेलनाचे वेळेस हॉटेलमध्ये म्हणजे बाहेर रुम्स् घेणाऱ्यांनी सर्वप्रथम डॉर्मेटरीचा विचार करावा असे वाटते.

श्री. विजयसिंह व सौ. अलका या उभयतांनी नोकरी करून निवृत्त झाल्यानंतर स्वत:च्या कर्तबगारीतून हे विश्व निर्माण केले आहे. आयुष्याच्या दुसऱ्या इनिंगमध्ये निवृत्तीनंतर सुखदायी व आरामदायी जीवन जगण्याचा सर्वांचाच मानस असता. परंतु निवृत्तीनंतर हे उभयता स्वस्थ न बसता कार्यरत राहून जी निर्मिती केली ही बाब भिडे मंडळाच्या दृष्टीने नक्कीच अभिमानास्पद आहे. आम्हा १० मंडळींचा त्यांनी केलेला पाहुणचार व आदरातिथ्य वाखाणण्यासारखे होते. या उभयतांबरोबरच सौ. संगिताताई व सतिश भिडे, सौ. व ॲड. अविनाश भिडे व सौ. आदिती भिडे ही उभयता भिडे मंडळी व विक्रम, चेतन, चैतन्य भिडे यासारखे तरुण व इतर भिडे मंडळींनी त्या दिवशी झालेल्या बैठकीत उत्स्फुर्तपणे दाद दिली. कोणतेही सार्वजनिक काम करताना काही व्यक्ती एकत्र येऊन संघटीतपणे काम केले तर यश मिळते याची झलक बघायला मिळाली. स्थानिक भिडे मंडळींनी दिलेल्या प्रतिसादामुळे हे संमेलन यशस्वी व अभूतपूर्व उपस्थितीत होणार असा विश्वास वाटतो. प्रतिष्ठानचे पदाधिकारी व सदस्य हे त्यांना मदतीचा हात देण्यास सदैव कटिबद्ध आहेतच. तरी सुद्धा सांघिक जबाबदारी म्हणून आपल्या सर्वांचे सहकार्य व मदतीची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने आपण सर्व भिडे ज्ञाती बांधवांनी या संमेलनाला उपस्थित राहून आनंद घ्यावा. पुढील अंकात नाशिक स्थानिक भिडे मंडळी सहभागी कार्यकर्त्यांची नावे व संपर्क क्रमांक देत आहोत. नाव व संपर्क क्रमांक द्यायचा असल्यास आमचेकडे कळवावा. पुढील अंकात यादी देताना त्याचा समावेश करण्यात येईल. **- दिलीप भिडे**, ९६५७५४१२३६

## वसंतोत्सव २०१५ (डोंबिवली कल्याण विभाग)

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानच्या कल्याण व डोंबिवली विभागातून भिडे भगिनी व माहेरवाशिणींचा चैत्रगौरी हळदीकुंकू कार्यक्रम दि. २९ मार्च, २०१५ रोजी सायंकाळी आयोजित केला होता. कार्यक्रमाची सुरुवात देवीच्या आरतीने झाली. चैत्रगौरीचे महत्त्व काय याबद्दल सौ. भिडे यांनी सांगितले. सौ. अनुपमा भिडे यांनी विविध भक्तिगीते सादर केली. सौ. रजनी भिडे यांच्या कविता वाचनानंतर विविध स्पर्धा व भाषिक खेळाचा कार्यक्रम झाला. स्पर्धेतील विजेत्यांना कु. कुमुदिनी भिडे, कल्याण यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले. आंब्याची डाळ, करंजी आणि कैरीच्या पन्ह्याचा आस्वाद घेऊन, आभारप्रदर्शनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. सणाचे औचित्य साधून भिडे भगिनी आणि माहेरवाशिणींनी एकत्र येऊन महिलांना उपयुक्त ठरणारे कार्यक्रम घ्यावेत तसेच दर तीन महिन्यांनी



एकत्रित बैठक घ्यावी असेही सूचित केले. त्या संपूर्ण कार्यक्रमाचे संयोजन प्रतिष्ठानच्या महिला समिती सदस्य ॲड. अलकाताई भिडे यांनी केले.

## अभिनंदन !



रत्नागिरी येथील प्रसिद्ध भरतनाट्यम नृत्यांगना आणि नृत्यगुरु म्हणून ओळख असलेल्या **सौ. मिताली मंदार भिडे** यांना लातूर येथील पंचमवेद नृत्यांजली महोत्सवात 'पंचमवेद नृत्यतपस्वी' आणि नागपूर येथील भारतीय कला प्रोत्साहन मंचतर्फे 'महाराष्ट्र ज्योती कला' या दोन पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. जानेवारी २०१५ मध्ये संगमेश्वर (रत्नागिरी) येथे झालेल्या भिडे संमेलनामध्ये सौ. मिताली यांनी आपल्या काही शिष्यांसोबत भरतनाट्यमच्या काही रचना सादर केल्या होत्या. रत्नागिरी येथे त्या नृत्याचे क्लसेसही घेतात. भिडे प्रतिष्ठानतर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन आणि भावी आयुष्यात असेच यश मिळो हीच सदिच्छा !

**सौ. स्नेहा विराज भिडे** या HSBC, पुणे येथे कार्यरत असून त्यांना कंपनीतर्फे विशेष उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल 'बेस्ट एम्प्लॉईज' म्हणून गौरविण्यात आले. नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान कडून त्यांचे अभिनंदन !

**सूचना :** सांगली व मिरज येथून भिडे प्रतिष्ठानचे काम करणारे श्री. कुमार विष्णू भिडे राहणार सांगली जानेवारी २०१५ मध्ये पुण्यामध्ये कायम वास्तव्यासाठी आलेले आहेत. त्याकरिता सांगली व मिरज येथून भिडे प्रतिष्ठानचे काम करण्यासाठी सांगली येथील श्री. श्यामराव भिडे (संपर्क क्र. ९४११३३५८२) कार्यरत राहणार आहेत. तरी सांगली व मिरज येथील भिडे प्रतिष्ठानच्या कामाच्या संदर्भात तेथील भिडे कुल/बंधू व भगिनींनी श्री. श्यामराव भिडे यांच्याशी संपर्क करावा.

**सहवेदना :** भिडे कुलातील निधन झालेल्या ज्ञात-अज्ञात कुलबंधू-भगिनी आणि माहेवाशिणींना भिडे प्रतिष्ठान श्रद्धासुमने अर्पण करीत आहे. इश्वर त्यांना चिरशांती देवो, ही प्रार्थना !

● श्रीमती भारती केशव भातखंडे, मुरबाड ● सौ. मालती महादेव भिडे, पुणे ● सौ. रमा डोंगरे, ठाणे

**एप्रिल २०१५ ते जून २०१५ पर्यंतचे देणगीदार**

**१) श्री. एम. जे. भिडे, मुंबई : रु. १०,००० शैक्षणिक निधी देणगी**

आम्ही भिडे **अंक २४ वा**

संपादक : श्री. शशिकुमार केशव भिडे

कार्यकारी संपादक : ले. क. सुनिल भिडे

संपादक मंडळ : श्री. प्रभाकर भिडे, श्री. दिलीप भिडे, विनायक स. भिडे, श्री. चिंतामणी भिडे, श्री. विलास भिडे, सौ. प्रिया भिडे, श्री. विजय अ. भिडे, सौ. पूर्वा देवधर, सौ. प्रिती प्र. भिडे

सल्लागार मंडळ : श्री. सुनिल भिडे (अभिरूची), शशिताई घुले, के. मो. भिडे, गजानन भिडे, रवींद्र भिडे (कर्मयोग)

अक्षर जुळणी : सौ. विनीता डबीर

## नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान, मुंबई

**(ई-२०१४० (मुंबई) दि. १६ एप्रिल २००२)**

### वार्षिक सभेची सूचना

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानच्या सभासदांची पंधरावी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक ०४ ऑक्टोबर २०१५ रोजी सायंकाळी ५.०० वाजता खालील ठिकाणी भरेल, सर्व सदस्य भिडे कुलबंधू, भगिनी, माहेरवाशिणींनी सभेला हजर राहावे ही विनंती.

**सभेपुढील विषय**

१) स्वागत व प्रास्ताविक.
२) चौदाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे कार्यवृत्त वाचन व मान्यता.
३) वार्षिक अहवाल आणि ३१ मार्च २०१५ रोजी संपलेल्या वर्षाच्या हिशेबपत्रकांना मान्यता.
४) सन २०१५-२०१६ वर्षासाठी हिशेब तपासनिसांची नेमणूक.
५) नवीन विश्वस्तांची नेमणूक करणे.
६) अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळचे अन्य विषय.

**विशेष सूचना** - १) गणसंख्येअभावी सभा तहकूब करावी लागल्यास तहकूब झालेली सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी वरील कामकाजासाठी अर्ध्या तासाने सुरू होईल व अशा सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही. २) सभासदांना काही प्रस्ताव, सूचना, स्पष्टीकरण इत्यादी आवश्यक असेल तर त्या संबंधी त्यांनी लेखी स्वरूपात दि. २५ सप्टेंबर २०१५ पर्यंत प्रतिष्ठानच्या पुणे कार्यालयात विचारणा करावी. त्यामुळे आवश्यक ती माहिती सभेच्या वेळी तयार ठेवता येईल.

कार्यकारिणीच्या आदेशान्वये

**प्रभाकर शं. भिडे,** चिटणीस

**सभेचे स्थळ** - हॉटेल 'सदानंद', डी मार्टचेसमोर, बाणेर, पुणे.

## पाऊस

**सौ. प्रिती भिडे, पुणे.**
९९२२९४४०८२

असा कसा हा पाऊस, कधी वेळेवर येतो.....
बळी राजाच्या कामाला, थोडी उसंत ना देतो !
असा कसा हा पाऊस, कधी डोळा पाणी काढतो.....
दुष्काळाचे संकट तो, आम्हाला का देतो !
असा कसा हा पाऊस, खादाडांना आवडतो.....
भजी, वडे सेवनाने, पोटं बिघडवतो !
असा कसा हा पाऊस, त्याच्या युगुले प्रेमात.....
जवळ येण्याची तो, संधीच की तो देतो !
असा कसा हा पाऊस, कुणी सदा काळजीत.....
पिलाच्या काळजीत, आई बसली चिंतेत !
असा कसा हा पाऊस, गरीबाला छळतसे.....
कधी गडप होऊनी, महागाई वाढतसे !
असा कसा हा पाऊस, मला वाटतो तो भला.....
सृष्टी आणि चराचरं, बघ जो तो सुखावला !

# आठवणी झाटलात !

सौ. प्राची स. भिडे.
अद्वैत, अंधार आळी, रोहा-रायगड-४०२ १०९
मो. नं. ९७६६४४७९४०

**या देवी सर्वभुतेषु मातृरूपेण संस्थिता ।**
**नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नम: ।।**

असे जिचे वर्णन करता येईल ती माझी आई श्रीमती भारती केशव भातखंडे ही दि. ३/०३/२०१५ रोजी कल्याण येथे देवाघरी गेली. माझी आई पूर्वाश्रमीची कु. कमल त्र्यंबक भिडे म्हणजे भिड्यांची माहेरवाशिण. भिडे कुलवृत्तांतात श्री. बाळकृष्ण भिडे व श्रीहरी भिडे या गुणी बंधूंची विशेष ओळख करून दिली आहे. त्याची मोठी गुणी बहीण म्हणजे माझी आई.

माझ्या आईचे माहेर ठाण्याचे. वयाच्या २०व्या वर्षी तिचे लग्न कल्याणचे सुविद्य श्री. केशव वामन भातखंडे यांच्याशी झाले. श्री. भातखंडे यांचा जन्म धार्मिक घराण्यात झाला व त्यांना स्वत:लाही अध्यात्माची आवड होती. अतिशय लहान वयातच ते अभ्यासपूर्ण कीर्तने, प्रवचने आवडीने करत होते. वास्तविक त्यांना कल्याणलाही नामवंत शाळेत नोकरी होती, परंतु खेडेगावात जाऊन शाळा काढायची, ह्या ध्येयाने ते मुरबाडला गेले तेथे त्यांनी 'न्यू इंग्लीश स्कूल' ही शाळा सुरू केली. मुरबाडला त्यांना सगळे वातावरण ही अध्यात्मिक वाटचालीसाठी पोषक, शांततेचे मिळाले. त्यामुळे माझ्या ती. आईचा संसार मुरबाडलाच सुरू झाला.

कुलधर्म, कुलाचार, सण, लग्न, बारशी इत्यादीच्या कारणाने ती कल्याणला आपल्या सासरच्या मूळ घरी नेहमी जात-येत असे. कल्याणच्या घरी चार दीर, चार नणंदा, सख्खे व चुलत सासू-सासरे, नोकर-चाकर, अशा सर्वांना तिने आपल्या वागण्या-बोलण्याने आपलेसे केले होते. लग्नानंतरची ५-६ वर्षे घर-संसार व आम्ही तीन मुले यात गेली.

लग्न झाले तेव्हा ती. आईचे शिक्षण फक्त मॅट्रिकपर्यंत झाले होते व राष्ट्रभाषा -सभा मुंबईच्या 'हिंदी' परीक्षांतील ती पंडित होती. योगायोग असा की, त्या काळात सरकारी कर्मचारी सरकारने हिंदी परीक्षा उत्तीर्ण असणे अनिवार्य केले होते. मुरबाड सारख्या ग्रामीण भागात त्या काळी आई जशी हिंदी 'पंडीत' होती तसे कोणी नव्हते. त्यामुळे अनायसे तिला सरकारी कर्मचाऱ्यांना हिंदी शिकविण्याची संधी चालून आली आणि हेच तिच्या सगळ्या शैक्षणिक कारकीर्दीचे बीज ठरले.

मुरबाडसारख्या ग्रामीण भागात (त्या काळी) आपले पतीचे शाळेत शिक्षकाची ही गरज आहे हे आळखून तिने पुणे विद्यापीठातून बाहेरून अभ्यास करून बीए. ही पदवी प्राप्त करून घेतली. व आपल्या पतीच्या ध्येयाच्या वाटचालीत साथ द्यायला सुरुवात केली. सुरुवातीला काही काळ अर्ध वेळ नोकरी केली. नंतर पुण्याला एस्. एन्. डी. टी. तून अध्यापकांना अनिवार्य असलेले बी. एड. शिक्षण पूर्ण केले.

तिच्या अभ्यासाचा विषय मराठी भाषा हा होता व खेरीज तो तिच्या आवडीचाही विषय होता. त्यामुळे तिचे मराठी नवे-जुने साहित्यावर काव्यावर विशेष प्रेम होते. अनेक वामनपंडित, कवी किंवा नवीन कुसुमाग्रज, मर्ढेकर, शांता शेळके इ. च्या काव्यरचना तिच्या तोंडपाठ होत्या. मराठी व्याकरणातील वृत्त-अलंकार इ. तिचे मुखोद्‌गत होते. तिचे अध्ययन-लेखन, अध्यापन-वक्तृत्व अशा अनेक गुणांची जाणीव तिला तिच्या कॉलेजमधील नामवंत प्राध्यापकांनी गुण करून दिली व तिला लिहिण्याची कथा लेखनाची प्रेरणा त्यामुळे मिळाली. तिच्याजवळ मुळात प्रतिभा होतीच त्यामुळे तिने बी. एड. नंतर अनेक कथा लिहिल्या. रोहिणी, माहेर, हंस इत्यादी अनेक मासिकांतून तिच्या कथा प्रसिद्ध होत. कथा स्पर्धांमध्येही तिने पुरस्कार मिळविले आहेत. आकाशवाणी, दूरदर्शन अशा माध्यमांतूनही ती आता-आतापर्यंत म्हणजे वयाच्या ८०-८१ व्या वर्षी ही कथा-कवितांचे सादरीकरण करत होती. 'वृंदा' व 'तूच माझी लक्ष्मी' असे कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. याच काळात म्हणजे १९७४-७५ च्या सुमारास तिने पुन्हा एकदा बाहेरून अभ्यास करून पुणे विद्यापीठाची मराठीतील एम. ए. ही पदवी प्राप्त करून घेतली. अनेक वर्षे ती शालांत परीक्षा म्हणजे इ. १० वी चे बोर्डाचे मराठीचे पेपर तपासून देत असे.

या अध्ययन-अध्यापनाच्या जोडीला तिच्याजवळ असलेले एक लेणे म्हणजे तिला जन्मजात लाभलेला गोड गळा. तिचा आवाज अतिशय गोड होता. नुसत्या गद्य बोलण्याला सुद्धा एक नाद होता. गाण्याचे तसे शास्त्रीय शिक्षण घेतलेले नव्हते. म्हणून पुण्याला बी. एड. ला असताना संगितातील बेसिक शिक्षण घेतले. भक्तिगीते, भावगीते नाट्यगीते इत्यादी कार्यक्रम ती तिच्या उमेदीच्या काळात करायची. शाळेतही शारदोत्सव, स्नेहसंमेलन इ. प्रसंगांना विद्यार्थ्यांकडून पेटी-तबला इ. साथीवर गाणी बसवून घ्यायचे काम तिच्याकडेच असायचे. घरात किंवा ओळखीतही कुणाकडे बारसे, डोहाळ जेवण, मुंज, लग्न अशा समारंभरात ती उत्स्फूर्तपणे काव्य रचून, चाल लावून गोड आवाजात म्हणत असे. स्वातंत्र्य सैनिक, हुतात्मा भाई कोतवाल, तानाजी मालुसरे यांसारख्या योद्ध्यांवरही तिने स्वतंत्रपणे पोवाडे रचले आहेत. सकाळी उठल्यापासून ती एखादे सुंदर गाणे गुणगुणत असायची व मग दिवसभर तेच गाणे जणू तिच्या मागे-पुढे होऊन तिच्या मुखात येत असे. हार्मोनियम काढून गाणी म्हणणे हा तिचा विसावा होता.

कथा-कादंबरी-गाणी यातील जी संवेदनशीलता होती. ती तिच्या समाजातील लोकांबरोबर वागण्यातही होती. मुरबाड तालुक्यातील अनेक लोकांना अनेक प्रकारे मदतीचा हात तिने पुढे केला आहे. एखाद्या स्त्रीला सासरकडून, व्यसनी पत्नीकडून छळ होत असेल, उत्पन्नाचे काही स्वतंत्र साधन नसेल तर अशा परिस्थितीत आई तिला स्वत: कोर्टात किंवा वकिलांकडे नेऊन तिला योग्य ती मदत करीत असे. कोणाचे पेन्शन मिळत नसेल तर स्वत: सरकार दरबारी जाऊन त्याला पेन्शन मिळविण्यासाठी आवश्यक आहे ते करत असे. विद्यार्थ्यांना त्यांच्या भाषणात-निबंधात-लेखनात मुद्दे काढून देणे इत्यादी मदत, मार्गदर्शन तर करत असेच पण खेरीज त्याचे घरगुती, आर्थिक अडचणी दूर करण्यासाठी सहाय्य करत असे. यामुळेच की काय ती मुरबाड ग्रामपंचायतीत भाजपकडून निवडून आली होती व तिच्या कार्यकालात तिने तिचे काम अत्यंत प्रामाणिकपणे व जेवढे चांगले करता येईल तेवढे करून आपला ठसा उमटविला होता. सुशिक्षित-सुसंस्कृत माणसांनाही राजकारणावर नुसत्या गप्पा न मारता स्वत: भाग घेऊन काम करून दाखवले पाहिजे हा वस्तुपाठ आदर्श म्हणून ठेवला.

घरातही ती अत्यंत आदर्श गृहिणी होती. ती ठाण्यासारख्या शहरातून मुरबाडला ग्रामीण भागात आली होती, पण तिने त्याचा कधीही बाऊ केला

नाही. विहिरीतून पाणी काढणे, अंगण शेणाने सारवणे, चूल पेटवणे इत्यादी कामेही ती सहज करायची. कोणतेही काम तिला वर्ज्य नव्हते. तिच्या उत्तम प्रकृतीचे रहस्य ती अंग झाडून काम करण्यातच आहे असे ती म्हणत असे. कोणत्याही कामाचा तिला कंटाळा आळस, वैताग माहीत नव्हता. हातात घेतलेले कोणतेही काम जिद्दीने पूर्ण करण्याचा तिचा साक्षेप वाखाणण्यासारखा होता. त्यामुळेच सर्व साधारण पणे माणसाला वृद्धपणी जगण्याचा कंटाळा येतो, वेळ जात नाही. अशा प्रकारचे प्रश्न तिला कधीही पडले नाहीत. जगण्यातला आनंद ती शेवटपर्यंत घेत होती.

त्या काळात मुरबाडला सातवीपर्यंत फक्त जिल्हापरिषदेच्या शाळा होत्या. आम्हीही ग्रामीण भागात, त्याच शाळेत शिक्षण घेत असल्याने आमच्या वागण्यात कुठेही असंस्कृतपणा येऊ नये. बोलण्यात कुठेही अशुद्ध उच्चार येऊ नये यासाठी ती दक्ष असे. प्रत्येक कामाची तिची एक शिस्त असे. काम, अभ्यास नीटनेटकेपणाने, बेळेवर झालेच पाहिजे असा तिचा दंडक होता. काम पूर्ण न करता हात हालवत परत आलेले तिला अजिबात आवडत नसे. त्यामुळे आम्हा मुलांना तिचा आदरयुक्त धाक असे. हे सर्व आमच्या भविष्यातील चांगल्यासाठीच - हितासाठीच होते. जसे ज्ञानेश्वर महाराजांनी म्हटले आहे की,



'मातेच्या कोपी थोकले स्नेह आधी! खाणे-पिणे-लेणे या गोष्टींना फाजील महत्त्व देऊ नये असे ती वेळोवेळी आम्हाला सांगत असे. पण अशी नुसतीच शिस्त नव्हती तर आमच्यावर त्याच्यापेक्षा कितीतरी अधिकपट प्रेम होते. मला लहानपणी सतत खोकला होत असे. अर्थातच खाण्या-पिण्यावर बंधन असे. त्यावेळेस तळलेले पदार्थ जसे पापड, भजी इ. ती स्वत:ही कधी खात नसे. आजारपणात रात्र रात्र माझ्या उशाशी बसून मला शेकणे, औषध देणे इ. करत असे. आम्हा मुलांच्या शिक्षणाच्या बाबतीतही तिची एक ठाम भूमिका होती. नुसते पदवीपर्यंतचे शिक्षण घेणे तिला मान्य नव्हते. त्यामुळेच माझी मोठी बहिण डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे ही बी.ए. नंतर एम.ए. झाली व लग्नानंतरही तिने दत्त-संप्रदायावर पीएच.डी. केले व मी ही बी.कॉम नंतर एल.एल.बी. केले. माझा मोठा भाऊ श्री. राजीव याचा कल शिक्षणापेक्षा व्यवसायाकडे आहे हे लक्षात घेऊन त्याच्या मागे ठामपणे उभी राहून त्याला व्यवसायाला प्रेरणा दिली व मदत केली. मराठी माणसाने सुद्धा व्यवसाय केला पाहिजे असे आपण आज म्हणतो पण माझ्या आईने सुमारे ४० वर्षांपूर्वीच अशा प्रकारचे स्वत: करून दाखवले होते.

तिन्ही मुलांचे विवाह योग्य त्या वयात करून दिल्यावर नातवंडे झाली. असा सुस्थितीत संसार चालू असताना, वयाच्या ५४-५५ व्या वर्षी तिला दुर्दैवाने पतिवियोग झाला. त्यानंतरच तिचे धैर्य पणाला लागण्याचे अनेक प्रसंग तिच्यावर कोसळले. शाळेतील तीन-चार वर्षे. नोकरीची शिल्लक होती. मुलगा व्यवसायानिमित्त कल्याणला राहात होता. ती एकटीच मुरबाडला राहायची. पण तिला भीती म्हणून माहीत नव्हती. पतिवियोगाचे संकट कमीच म्हणून काही वर्षांनी तिचा मोठा मुलगा श्री. राजीव अकस्मात ब्रेन ट्यूमरने देवाघरी गेला. त्याच्या शाळेत व कॉलेजात शिकणाऱ्या दोन मुली व त्याची पत्नी यांची जबाबदारीही आईने धैर्याने घेतली व आपल्या पुत्र-वियोगाचा आघात सहन करून आपली सून व आपल्या दोन नाती यांच्या मागे एखाद्या पहाडासारखी उभी राहिली. त्यानंतर तिने तिच्या दोन्ही नातींना, सारिका व सुप्रिया यांना आपल्या वडिलांची कोणतीही उणीव भासू न देता त्यांच्यावर संस्कार केले, त्यांचे शिक्षण लग्न व अगदी अखेरचा निरोप घेण्याच्या आधीच काही दिवस पतवंडांची बारशापर्यंतची सर्व जबाबदारी पार पाडली व आपली सून हेमा हिला कोणतेही आर्थिक परावलंबित्व येऊ नये म्हणून पूर्ण व्यवस्था करूनच जगाचा निरोप घेतला.

अगदी शेवटच्या तिच्या १० वर्षांत म्हणजे सत्तरीनंतर तिने मुरबाडच्या आपल्या शेतात छोटी शेती व भाजीचा मळा फुलवला. तिला त्या झाडांच्या-फुलांच्या संगतीत एक निराळाच अपूर्व आनंद मिळतो असे ती सर्वांना सांगत असे. त्याच काळात मुरबाडचा जुना वाडा पाडून तिथे नवीन अद्ययावत तीन मजली सदनिका बांधून घेण्यातही पुढाकार घेतला. तेही काम वयाची ऐंशी वर्षे

## भिडे कुलप्रतिष्ठानतर्फे वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !

### जुलै

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. मुकुंद कृष्ण भिडे, बेळगांव | १ |
| २. | श्री. विवेक वसंत भिडे, रत्नागिरी | २ |
| ३. | श्री. शशिकुमार के. भिडे, पुणे | २ |
| ४. | समीर सुधीर भिडे, ठाणे | ५ |
| ५. | श्री. रामचंद्र काशिनाथ भिडे, कल्याण | ७ |
| ६. | विमल रघुनाथ घाणेकर, पुणे | ८ |
| ७. | श्री. वसंत सदाशिव भिडे, बोरिवली | १५ |
| ८. | सौ. अंजली कुलकर्णी, मुंबई | १५ |
| ९. | सौ. सुनंदा दिलीप भिडे, मुंबई | १६ |
| १०. | श्री. वासुदेव परशुराम भिडे, डोंबिवली | १७ |
| ११. | श्री. अनिल वामन भिडे, पुणे | १७ |
| १२. | श्री. अशोक पुरुषोत्तम भिडे, पनवेल | २० |
| १३. | सौ. अस्मिता प्रवीण भिडे, गोवा | २२ |
| १४. | कु. दीपांकिता सुनिल भिडे, पुणे | २३ |
| १५. | श्री. बळवंत भिडे, अंमळनेर | २३ |
| १६. | श्री. अरविंद विद्याधर भिडे, पुणे | २३ |
| १७. | श्री. विनय विष्णू भिडे, पुणे | २४ |
| १८. | सौ. स्मिता भिडे, मुंबई | २७ |
| १९. | श्री. शंकर त्रिंबक भिडे, पुणे | २८ |
| २०. | श्री. तेजस श्रीकृष्ण भिडे, मालाड | ३० |
| २१. | सौ. अनुराधा अविनाश भिडे, मिरज | ३० |

### ऑगस्ट

| | | |
|---|---|---|
| १. | सौ. मीरा मधुकर भिडे, गुजराथ | ३ |
| २. | श्री. विधाकर वासुदेव भिडे, पुणे | ५ |
| ३. | कु. सुबोध श्रीकांत भिडे, रोहा | ६ |
| ४. | श्री. श्रीकृष्ण रघुनाथ भिडे, पुणे | ६ |
| ५. | सौ. योगिनी माधव भिडे, पुणे | ७ |
| ६. | ओंकार मिलींद भिडे, पुणे | १० |
| ७. | सौ. शिल्पा महेश जोशी, मुंबई | ११ |
| ८. | श्री. अमित दिलीप भिडे, पुणे | १२ |
| ९. | श्री. राजेंद्र महादेव भिडे, दादर | १३ |
| १०. | सौ. प्रसन्ना सुभाषचंद्र भिडे, पुणे | १४ |
| ११. | कु. ऋता चिंतामणी भिडे, ठाणे | १५ |
| १२. | ले.क. सुनिल वासुदेव भिडे, पुणे | १५ |
| १३. | श्री. मिलींद पुरुषोत्तम भिडे, पुणे | १८ |
| १४. | डॉ. संदीप दत्तात्रय भिडे, गुजराथ | १९ |
| १५. | सौ. वंदना विवेक भिडे, दिल्ली | २१ |
| १६. | श्री. माधव पुरुषोत्तम भिडे, पुणे | २१ |
| १७. | सौ. सुजाता प्रदीप भिडे, पुणे | २१ |
| १८. | सौ. विद्या विश्वनाथ भिडे, पुणे | २२ |
| १९. | श्री. निलेश अशोक भिडे, पनवेल | २६ |
| २०. | श्री. विवेक विजय भिडे, दिल्ली | २६ |
| २१. | श्री. विनायक सखाराम भिडे, डोंबिवली | २७ |
| २२. | श्री. विजय रघुनाथ भिडे, ठाणे | २८ |
| २३. | सौ. सुचिता आशिष भिडे, भोपाळ | २८ |
| २४. | सौ. शर्वरी शिरीष शेवाळकर, पुणे | ३० |
| २५. | श्री. गोपाळ अनंत भिडे, किहीम | ३१ |
| २६. | श्री. गोविंद काशिनाथ भिडे, सोलापूर | ३१ |

### सप्टेंबर

| | | |
|---|---|---|
| १. | कु. सुरभी राजेंद्र भिडे, डोंबिवली | १ |
| २. | श्री. केदार प्रभाकर भिडे, डोंबिवली | २ |
| ३. | श्री. प्रसाद वसंत भिडे, ठाणे | ३ |
| ४. | सौ. वैजयंती रामचंद्र भिडे, कल्याण | ३ |
| ५. | कु. विश्वेश मुकुंद भिडे, बेळगाव | ४ |
| ६. | श्रीमती संध्या त्रिंबक भिडे, पुणे | ७ |
| ७. | श्रीमती आरती अनंत भिडे, चिपळूण | ७ |
| ८. | सौ. अनुराधा गोविंद भिडे, सोलापूर | ९ |
| ९. | श्री. अमित अरविंद भिडे, पुणे | १० |
| १०. | कु. बागेश्री अविनाश भिडे, पुणे | १० |
| ११. | श्रीमती शशी मुरलीधर घुले, पुणे | ११ |
| १२. | श्री. प्रवीण भिकाजी भिडे, गोवा | १३ |
| १३. | श्री. श्रीराम श्रीपाद भिडे, चिपळूण | १५ |
| १४. | श्री. आनंद भिडे, मुंबई | १६ |
| १५. | सौ. कल्पना विनायक भिडे, धुळे | १८ |
| १६. | कु. प्रसाद केदार भिडे, डोंबिवली | १८ |
| १७. | श्री. विनायक विश्वनाथ भिडे, पुणे | १८ |
| १८. | श्री. ललिता र. केसकर | २० |
| १९. | सौ. रेणुका केदार भिडे, पुणे | २२ |
| २०. | श्रीमती वैशाली विलास भिडे, हैद्राबाद | २५ |
| २१. | कॅ. विवेक प्रभाकर भिडे, मुंबई | २६ |
| २२. | कु. सारंग संतोष भिडे, ठाणे | २६ |
| २३. | श्री. रोहित विजय भिडे, ठाणे | २७ |
| २४. | सौ. अपर्णा सुहास भिडे, सातारा | २९ |
| २५. | श्री. सुधीर गणेश भिडे, ठाणे | २९ |
| २६. | श्री. बल्लाळ श्रीधर भिडे, चिपळूण | २९ |

* * *

उलटलेली असताना पूर्ण केले.

सर्वसाधारणपणे शहरात राहणारे लोक खेड्यात व्यक्तिमत्त्व विकास हवा तसा होत नाही. शिक्षण-संस्कार-संधी जशा हव्या तशा नसतात असे म्हणत असतात. पण आईने मात्र हा शहरातील लोकांचा गैरसमज आहे हे दाखवून दिले. अध्ययन-अध्यापनातील तिच्या नैपुण्याबद्दल तिला आदर्श शिक्षिका-जिल्हा पुरस्कार व तसेच आदर्श शिक्षिकेचा महाराष्ट्र राज्य पुरस्कार असे पुरस्कार मिळाले. खेरीज आदर्श महिला-समाजसेविका-सावित्रीफुले पुरस्कारही मिळाला आहे. कथालेखन-वक्तृत्व-भाषण-काव्य इ. ही छोटे-मोठे अनेक पुरस्कार बक्षिसे तिला मिळालेली आहेत.

मुरबाड तालुक्यात माझी आई व माझे वडिल वै. केशव वामन भातखंडे या चारित्र्यसम्पन्न, देवतुल्य व्यक्तिमत्त्वांना कोणी ओळखत नाही असे नाही. माझ्या आईच्या व्यक्तिमत्त्वातील पैलू लक्षात घ्यायचे ठरवले तर ती आदर्श आई, आदर्श पत्नी, आदर्श शिक्षिका, आदर्श सासू, आदर्श आजी, गोड गळ्याची गायिका, मळा व शेत फुलवणारी शेतकरीण, समाजसेविका ते अगदी व्यावसायिक पातळीवर घरी बांधून घेणारी व्यवसायिक पातळीवर घर बांधून घेणारी व्यवसायिक असे एखाद्या पुरुषालाही जमणार नाही असे कर्तृत्व करून दाखवणारी अशी नऊ गुणांनी सम्पन्न असलेली नवदुर्गा होती. या सगळ्यांपेक्षा माझ्यासाठी-आम्हा भावंडासाठी ती उत्तम संस्कार करणारी, आम्ही चुकलो तर


# यशस्वी प्रकल्पांची परंपरा

## फ्री होल्ड, पूर्ण विकसित, निवासी-रेखांकन-बिनशेती, कायदेशीर, बंगलो प्लॉटस्

www.guhagarlandprojects.com

OM ENTERPRISES



संपर्क : रविंद्र भिडे
9702782556 / 9869339543

देवदर्शन व पर्यटनासाठी निसर्गरम्य परिसरात
शाकाहारी, मद्यपानविरहीत,
सुखसोयींनी युक्त विश्रामगृह

# कर्मयोग

www.karmayognatureretreat.com



पत्ता : चिपळूण-गुहागर मार्ग (गुहागरपूर्वी १५ कि. मी.),
काजळीवाडी, गिमवी, ता. गुहागर

डोळ्यांत वेळीच अंजन घालणारी, तसेच तितकीच मायेची, पाखर घालणारी 'वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि' अशी माझी प्रेमळ आई होती.

तिच्या अखेरच्या काळीही, कोणाकडूनही कोणतीही सेवा करून न घेता केवळ दोनच दिवस हॉस्पिटलमध्ये राहून तिने जगाचा अखेरचा निरोप घेतला. आपल्या भिड्यांच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे वेळी 'माझी आई' पुरस्कार तिला मिळावा यासाठी तिचे नामांकन पाठवले होते. पण काही तांत्रिक कारणाने माझी आई आपल्या माहेरच्या-म्हणजे भिड्यांच्याच पुरस्कारापासून वंचित राहिली. ती खंत माझ्या मनाला लागली होती. ती हुरहूर, खंत काही प्रमाणात कमी व्हावी व सर्व भिडे मंडळींना माझ्या आईचा-मरणोत्तर का होईना पण परिचय करून द्यावा या हेतूने हा लेख सादर केला आहे.

अशा रीतीने उदंड व अखंड ऊर्जेचा स्त्रोत असा आदर्श तिने आमच्यापुढे ठेवला. शेवटी तिला साष्टांग दंडवत घालून हा स्मृतीलेख पूर्ण करते.

## *अभिप्राय...* १ फेब्रुवारी १९४८ : टर्निंग पॉईंट

प्रत्येक व्यक्तिचे व्यक्तिमत्त्व घडण्यास त्या व्यक्तिमधील गुणावगुण जेवढे कारणीभूत असतात तेवढेच परिस्थितीने दिलेले तडाखे, अनेक अडचणींच्या झळा, अचानक उद्‍भवलेली विपरीत परिस्थिती त्या विशिष्ठ व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्व जडणघडणीत स्वत:चे माप टाकत असते आणि मग अपरिहार्यपणे सगळे स्विकारत झगडून पुढे गेलेली ही व्यक्ती नियतीने मांडलेला डाव संघर्ष करून जिंकून जाते. या हृदयस्पर्शी भावनेचा प्रत्यय मेजर (माजी) डॉ. वासंती भिडे-मराठे यांनी लिहिलेल्या '१ फेब्रुवारी १९४८ टर्निंग पॉईंट' या आत्मचरित्राच्या वाचनाने येतो. वासंती विष्णुपंत भिडे या सांगलीतील सुसंस्कृत ब्राह्मण कुटुंबातील कन्यारत्न ! १५-२० माणसांचे एकत्र कुटुंब उद्योग क्षेत्रात रममाण होते. वडील अण्णासाहेब तथा विष्णू वि. भिडे यांनी गिरणी सोडून कारखान्यावरच लक्ष केंद्रित केले. परंतु अचानक १९४८ मध्ये गांधी हत्येनंतर झालेल्या जाळपोळीमध्ये भिडे कुटुंबाचे घर व कारखाना जाळण्यात आला. सगळं होत्याचं नव्हतं झालं आणि भावंडात सर्वांत मोठी असलेल्या लेखिकेच्या मनावर प्रचंड आघात झाला. ज्याच्या खुणा कधीच पुसल्या गेल्या नाहीत.

अभियांत्रिकी व्यवसायात असलेल्या भिडे कुटुंबात जन्माला आल्यामुळे व उपजतच बुद्धिमान असलेल्या डॉ. वासंती ताईंचे खरे तर इंजिनियर व्हावे हे स्वप्न होते. परंतु जाळपोळीनंतर सगळंच विखरून गेलं. भगिरथ प्रयत्नांवर भक्कम श्रद्धा असलेले वडील नियतीच्या तडाख्यानंतर आत्मविश्वास गमावून बसले. दु:खाचा कळस म्हणजे दोघा भावांच्या (काका व वडील) एकानंतर एक अशा आत्महत्यांनी कुटुंब उद्‍ध्वस्त झाले आणि लेखिकेचे मन 'त्यांनी असे का केलं ?' या प्रश्नाचे उत्तर शोधत राहिले.

अशातही त्यांनी वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले व नेत्र विभागात स्पेशलायझेशनची पदविका मिळविली थोडीफार स्वत:ची प्रॅक्टीस, इतरत्र नोकरी केली आणि १९६३ मध्ये भारत-चीन युद्धानंतर; 'मिलिटरी नोकरीसाठी'. वासंतीताईंनी अर्ज केला व निवड झाली. नोकरी मिळाली व ८ वर्षे मेजर या पदावर काम करून निवृत्ती घेतली. आर्मीच्या नोकरीतल्या आठवणी, आव्हानात्मक प्रसंग, सगळ्या जबाबदाऱ्या पार पाडल्यानंतर घेतलेला विवाहाचा निर्णय, वैवाहिक जीवन, लहानपणाचे निरागस पण शिस्तीचे आयुष्य अशा अनेक गोष्टींच्या अनुभवांमध्ये त्या वाचकांना सामावून घेतात. आज मेजर (निवृत्त) डॉ. वासंती भिडे-मराठे यांचे वय ८३ वर्षे आहे. तरीही बदलत्या जीवनशैलीशी जुळवून घेण्याचा उत्साह तोच आहे. याही वयात प्रकृतीमुळे बसून लिहिणे जमत नसल्याने ८० व्या वर्षी आय पॅड व मराठी टंकलेखन शिकून घेतले व आत्मचरित्राची सर्व ३०० पाने त्यांनी गादीवर आडवे झोपून स्वत: टाईप केली आहेत. हे कौतुकास्पद व अनुकरणीय आहे. संगमेश्वरच्या कुल संमेलनात त्या पुस्तकाचे वितरण करण्यात आले.

# प्रतिष्ठानचे पुरस्कार - २०१६

**समस्त भिडे कुलबंधु/भगिनी आणि माहेरवाशिणींकरिता**

दरवर्षी भिडे प्रतिष्ठानकडून भिडे कुलसंमेलनात खालील पुरस्कार देण्यात येतात. त्याकरिता खाली दिलेल्या निकषानुसार आपले नामांकन, पूर्ण नाव, पत्ता, संपर्क क्रमांक, शिक्षण, कौटुंबिक माहिती आत्तापर्यंत मिळालेल्या पुरस्कारासंबंधी माहिती आणि त्याच्या सत्य प्रति (झेरॉक्स) **व आपला आयकार्ड साईज फोटोसह डॉ. सौ. धनश्री श्रीनिवास भिडे, ३, श्रीधर अपार्टमेंट, १२, सीताबाग कॉलनी, सिंहगड रस्ता, पुणे ४११ ०३०. दूरध्वनी - ०२०-२४३३७४५५ ह्या पत्त्यावर दि. ३१ ऑक्टोबर २०१५ पर्यंत पाठवावेत.**

नामांकन देणारी व्यक्ती स्वत: किंवा त्याच्या नातेवाईकांनी वरील माहितीसह पाठविली तरी चालणार आहे.

**पुरस्काराचे स्वरूप :** शाल, श्रीफळ, प्रशस्तपत्रक व रोख रक्कम इ.

१) **साहस किंवा क्रीडा पुरस्कार** - भिडे कुटुंबातील साहसीवृत्तीय किंवा क्रीडा क्षेत्रामध्ये चमकदार कामगिरी करणाऱ्या भिडे कुलोत्पन्न व्यक्तीस हा पुरस्कार दिला जातो. (श्री. रा. म. भिडे पुरस्कृत कै. श्रीकृष्ण भिडे (श्रीकृष्ण भिडे प्रतिष्ठान) ह्यांचे स्मरणार्थ)

२) **'माझी आई' पुरस्कार** - भिडे कुलोत्पन्नातील गृहिणी, ज्येष्ठ स्त्री असावी, तसेच अल्प उत्पन्न व प्रतिकूल परिस्थितील तोंड देऊन मुलांकरिता किंवा स्वत:च्या कुटुंबाकरिता विशेष कार्य करणारी (श्री. रविंद्र रावजी भिडे, कल्याण पुरस्कृत त्यांच्या मातोश्री कै. सुशीला रावजी भिडे यांचे स्मरणार्थ)

३) **'आपली सून' पुरस्कार** - सुसंस्काराचा वारसा सतत पुढे नेण्याचे कार्य करणारी किंवा विशेष प्राविण्य अथवा विशेष पारितोषिक मिळालेली किंवा समाज कार्यात अग्रेसर असणारी किंवा अध्यात्मिक क्षेत्रात प्रचारकार्य करणारी किंवा विशेष लेखन करणारी किंवा प्रतिकूल परिस्थितीला तोंड देऊन मुलांसाठी, कुटुंबासाठी विशेष धडपड करणारी असावी. (सौ. मेधा उर्फ अनुराधा अविनाश भिडे, मिरज पुरस्कृत)

४) **'कला' पुरस्कार** - संगीत, नाटक, सिनेमा किंवा इतर कला क्षेत्रातील काम करणारी खास भिडे व्यक्ती असावी. (श्री. कुमार आणि वसंत विष्णू भिडे, सांगली पुरस्कृत, यांचे बंधू कै. सुभाष विष्णू भिडे, सांगली यांचे स्मरणार्थ)

५) **उद्योजक पुरस्कार** - लघुउद्योजक किंवा नव्याने व्यवसाय, उद्योग सुरू केलेला धडाडीने, कष्टाने, प्रतिकूल परिस्थितीत सुद्धा नेटाने व्यवसाय वृद्धी करणाऱ्या तरुण भिडे व्यक्तीस हा पुरस्कार दिला जातो. (श्री. कुमार विष्णू भिडे, सांगली पुरस्कृत यांचे वडील कै. विष्णू विनायक तथा अण्णासाहेब भिडे, सांगली यांचे स्मरणार्थ)

६) **आदर्श कार्यकर्ता पुरस्कार** - भिडे कुलोत्पन्नामधील पुरस्कार स्वीकारणारी व्यक्ती प्रतिष्ठानचे कार्य करणारी आणि कोणत्याही वयाची असावी, हा पुरस्कार कै. दामोदर (दामुकाका) केशव भिडे, डोंबविली यांचे स्मरणार्थ त्यांची मुलगी सौ. नेहा सातर्डेकर-भिडे, डोंबविली पुरस्कृत.

# सृष्टीचा वसंतोत्सव !

- सुचेता भिडे, कर्जत.
मो. ९२७१५०१३६३

**सहा ऋतुंचे सहा सोहळे, येथे भान हरावे**
**या जन्मावर या मरणावर शतदा प्रेम करावे !**

आपल्याला जगण्याची नवी उमेद देणाऱ्या या काव्यपंक्ती. यातील सहा ऋतू म्हणजेच निसर्गात होत जाणारे बदल. निसर्ग आपल्याला हे बदल वेगवेगळ्या प्रकारे दाखवत असतो. आजच्या भाषेत सांगायचं तर प्रत्येक ऋतूचे सेलिब्रेशन वेगळे. या सोहळ्याची सुरुवात होते ती वसंत ऋतूने. कोकिळेचे स्वर, मोगऱ्याचा सुगंध आणि जांभळ्या, लाल, पिवळ्या रंगाची उधळण करणारी वेगवेगळ्या झाडांची फुलं आपल्याला आनंद देत असतात. अशाच काही झाडांची ओळख करून घेऊ या.

अंजन, कांचन, करवंदीच्या काटेरी देशा असं आपल्या महाराष्ट्राचं वर्णन गोविंदाग्रज यांनी केलं आहे.


✲ **अंजन** : हा वृक्ष सह्याद्रीच्या डोंगर रांगांमध्ये दिसतो. साधारण मार्च-एप्रिलमध्ये हे झाड बहरतं. फुलांची रचना गोलाकार चेंडूप्रमाणे असते. गोलाकार गुच्छात साधारण ५० ते ६० लहान जांभळ्या रंगाची फुलं असतात. पानं लहान आणि चमकदार असतात. या झाडाचं लॅटिन भाषेतील नाव मेमोसाय लॉन अंबेलॅटम असं आहे. अंबेलॅटम म्हणजे छत्रीप्रमाणे गोलाकार फुलांच्यांचा.



✲ **तामण** : आपल्या महाराष्ट्र राज्याचं 'राज्यपुष्प' असा मान या झाडाच्या फुलानं मिळविलेला आहे. या झाडाच्या फांद्यांवर लांब लांब तुरे येतात. या तुऱ्यांवर सहा-सात नाजुक पाकळ्या असलेलं सुंदर फूल येतं. फुलाचा रंग जांभळा असतो. कधी कधी गुलाबी फूल असलेले तामणाचं झाड सुद्धा दृष्टीस पडतं. याचं शास्त्रीय नाव लाजरस्ट्रेमिया प्लॉस रेजिना असं आहे. लाजसस्ट्रॉमिया हे एका वनस्पती शास्त्रज्ञाचं नाव आहे तर लॉस रेजिना म्हणजे राणीचं फूल. या फुलाला इंग्रजीमध्ये क्विन्स फ्लॉवर म्हणतात.



✲ **पांगारा** : समुद्र किनाऱ्याच्या जवळ असलेल्या जंगलात पांगारा आपल्याला जास्त प्रमाणात दिसेल. याचं शास्त्रीय नाव आहे एरिथ्रिना इंडिका. एरिथ्रिना या लॅटिन शब्दाचा अर्थ रक्तवर्णाप्रमाणे लाल. इंडिका म्हणजे मूळचा भारतीय वृक्ष. लेग्यूमिनोसीपेपिलियोनेसी ह्याकुलातील हा वृक्ष. या झाडांच्या फुलांची ठेवण इतर फुलांपेक्षा खूपच वेगळी असते. झाडाच्या डहाळीवर गोलाकार कळ्या असतात. या लांब कळ्यांमधून टोकाला निमुळत्या होत जाणाऱ्या एकेक पाकळ्या फुलत जातात. पाच पाकळ्यांपैकी एक पाकळी एकटीच असते तर बाकी दोन पाकळ्या एकमेकांना चिकटलेल्या असतात.




✲ **अशोक** : सीता प्रभू रामचंद्रांची वाट बघत ज्या वृक्षाखाली बसली होती तोच हा अशोक वृक्ष. आपण अशोकाचं झाड म्हणून ज्या झाडाकडे बघत असतो ते झाड म्हणजे बिल्डिंगच्या आवारात उंच, ताठपणे उभे असलेले झाड. हे झाड अशोकाचं नाही. त्या झाडाचं नाव 'आशुपलव' असं आहे. अशोक हा डेरेदार वृक्ष आहे. याचं शास्त्रीय नाव 'सायका इंडिका'. घराच्या आवारात किंवा बागांमध्ये गोलाकार केशरी गुच्छ असलेली झाडं आपण नेहमी बघतो. इकझोरा नावाने ओळखली जातात. या झाडाच्या गुच्छांप्रमाणे अशोकाच्या झाडावर केशरी किंवा पिवळ्या रंगाची फुलं येतात. एका गुच्छात खूप फुलं येतात. त्यांना मंद सुगंध असतो.



✲ **सोनमोर** : लाल रंगाची उधळण करणाऱ्या गुलमोहर आपल्याला माहिती आहेच. या लाल रंगाच्या विरुद्ध पिवळ्या रंगात तेवढ्याच ताकदीने उभा असलेला सोनमोर वृक्ष. ज्याचं शास्त्रीय नाव 'पेल्टोफोरम फेरुजियम'. याची पानं गुलमोहराप्रमाणे संयुक्त प्रकारची असतात. फूल नाजूक, क्रेपच्या कागदासारखी असतात. एप्रिल-मे महिन्यात झाडाच्या खाली पिवळ्या फुलांचा सडा पडलेला असतो.



✲ **गुलमोहर** : हा आपल्या परिचयाचा वृक्ष. आपल्याला हा वृक्ष ओळखीचा वाटत असला तरी हा मूळचा भारतीय वृक्ष नाही. हा मादागास्कर बेटावरचा वृक्ष आहे. याचं शास्त्रीय नाव डेलोनिकस रेजिया असं आहे. रेजिया म्हणजे राजस. राजा जसा इतर लोकांमध्ये उठून दिसतो तसा हा वृक्ष इतर वृक्षांमध्ये उठून दिसतो. गुलमोहराच्या फुलाकडे नीट निरखून पाहिलं तर तुमच्या लक्षात येईल की फुलाच्या चार पाकळ्या लाल रंगाच्या असतात आणि एक पाकळी पांढरी असते. वेगळी असते. त्यामुळे याचं सौंदर्य आणखीनच खुलतं.



आपल्या शेजाऱ्यांबद्दल आपल्याला माहिती असते. नातेवाईकांची माहिती असते. वसंत ऋतुच्या सेलिब्रेशनमध्ये सक्रिय सहभाग घेणाऱ्या आपल्या आजूबाजूच्या या झाडांविषयी सध्यातरी एवढीच ओळख करून घेऊ या. ही झाडं आपल्याला गावाला जाताना, आपल्या शहरात, जंगलात कुठेतरी नक्की दिसतील. त्याच्या जवळ जा, त्याच्या शीतल छायेत बसून तळपत्या उन्हात सुद्धा वसंत ऋतूचा आनंद घ्या.

**व्यक्तिगत आर्थिक स्थैर्याचा निकष संस्थेच्या प्रगतीसाठीही तितकाच आवश्यक असतो. संस्था आर्थिक दृष्ट्या सुदृढ व्हावी व सर्व सदस्यांच्या सहाय्याने हे उद्दिष्ट साधावे ह्या हेतूने नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानला आपल्या वाढदिवसानिमित्त देणगी देऊन आपला वाढदिवस साजरा करा.**



# विद्यार्थी गुणगौरव योजना फॉर्म

**अ**

पालक/वडील/आईचा
सभासद क्रमांक

(विद्यार्थ्याने संपूर्ण माहिती स्वत:च्या हस्ताक्षरात भरावी)

१) संपूर्ण नाव

२) जन्म दिनांक जन्म ठिकाण

३) आजपर्यंत झालेला अभ्यासक्रम

४) पुढे काय शिकणार व कोणत्या गावी

५) सध्या शिकत असलेल्या शिक्षण संस्थेचे संपूर्ण नाव व पत्ता

६) विद्यार्थ्यांच्या वडिलांचे संपूर्ण नाव व नोकरी/व्यवसाय करीत असल्यास तेथील हुद्दा व पूर्ण पत्ता

दूरध्वनी/मोबाईल

७) विद्यार्थ्याची आई नोकरी/व्यवसाय करीत असल्यास तेथील हुद्दा व पूर्ण पत्ता

दूरध्वनी/मोबाईल

८) अ) विद्यार्थ्याच्या पालकांचे नाव व पूर्ण पत्ता

दूरध्वनी/मोबाईल

ब) पालकाचे अर्जदार विद्यार्थ्याशी नाते

९) अ) पत्रव्यवहाराचा पत्ता

ब) कायम राहण्याचा घरचा पत्ता

१०) कुठल्या गटातील गुणगौरव योजनेसाठी आपण माहिती सादर करीत आहात ?

११) सोबत जोडलेल्या प्रमाणपत्रांचा तपशील

दिनांक : विद्यार्थ्याची स्वाक्षरी

**ब**

(वडिलांनी/पालकाने भरावयाची माहिती)

१) अर्जदाराच्या वडिलांचे आणि त्याच्या कुटुंबातील इतर सर्व व्यक्तींचे एकूण वार्षिक उत्पन्न : रुपये (अक्षरी)

२) विद्यार्थी गुणगौरव योजनेअंतर्गत आपल्या मुलाचा/मुलीचा विचार करण्याचा असेल तर त्यासाठी आपण प्रतिष्ठानचे सदस्य असणे आवश्यक आहे याची कृपया नोंद घ्यावी. सदस्य नसलेले सदस्य होऊ शकतात. सदस्य होण्यासाठी भरावयाची रक्कम खालीलप्रमाणे आहे.

✲ आश्रयदाता : रु. १०,०००/- ✲ हितचिंतक : रु. ५,०००/- ✲ आजीव : रु. १,०००/-

पालकाची स्वाक्षरी

नाव :

पूर्ण पत्ता :

दूरध्वनी क्रमांक/मोबाईल

दिनांक : सभासद क्रमांक :

**विशेष सूचना :** १) माहिती सुवाच्य अक्षरात संपूर्ण भरून दि. ३१ ऑक्टोबर २०१५ पूर्वी पोहोचेल अशा बेताने खालील पत्त्यावर पाठवावी.

**सौ. धनश्री श्रीनिवास भिडे** (प्रमुख, विद्यार्थी गुणगौरव योजना)

३, श्रीधर अपार्टमेंट, १२, सीताबाग कॉलनी, सिंहगड रस्ता, पुणे ४११ ०३०. दूरध्वनी : ०२० २४३३७४५५

# विद्यार्थी गुणगौरव, पुरस्कार आणि ज्येष्ठांचे सत्कार याबाबत निवेदन

# इ. १० वी आणि इ. १२ वीच्या यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन !

दि. २३ व २४ जानेवारी २०१६ रोजी नाशिक (पिंपळगांव बसवंत) होणाऱ्या भिडे कुलसंमेलनात दरवर्षीप्रमाणे गुणगौरव, ज्येष्ठांचा सत्कार आणि पुरस्कार वितरण सभारंभ संपन्न होणार आहे. खाली दिलेल्या गटातील निकषांनुसार माहिती दि. ३१ ऑक्टोबर २०१५ पर्यंत आयकार्ड फोटोसह खालील पत्त्यावर पाठवावी. ● **डॉ. सौ. धनश्री श्रीनिवास भिडे** (प्रमुख, विद्यार्थी गुणगौरव योजना) ३, श्रीधर अपार्टमेंट, १२, सिताबाग कॉलनी, सिंहगड रस्ता, पुणे ४११ ०३०. फोन ०२० २४३३७४५५

## - विशेष सूचना -

१) विद्यार्थी गुणगौरव योजनेचा फॉर्म याच अंकात दिलेला आहे. त्याची झेरॉक्स प्रत उपयोगात आणली तरी चालेल किंवा आपल्या वेबसाईटवरून तो फॉर्म डाऊनलोड करून घ्यावा. २) अपूर्ण माहितीचा विचार केला जाणार नाही. ३) एकापेक्षा जास्त विद्यार्थ्यांची माहिती पाठवायची असल्यास या फॉर्मची झेरॉक्स प्रत उपयोगात आणावी. ४) पारितोषिका-साठी/पुरस्कारासाठी/सत्कारासाठी निवड झालेल्यांना पत्राने किंवा दूरध्वनीद्वारे संपर्क करून कळविले जाईल. त्याकरिता आपला संपर्क क्रमांक तसेच आयकार्डसाईज फोटो देणे आवश्यक आहे. ५) पुरस्कारा-साठी आपले नामांकन गटानुसार दिलेल्या निकषांप्रमाणे पाठवावे आणि त्या संबंधीच्या झेरॉक्स प्रती जोडाव्यात. ६) ज्येष्ठांच्या सत्काराकरिता आपले नाव, पत्ता, संपर्क क्रमांक, शिक्षण, व्यवसाय/नोकरी, सामाजिक कार्य व उल्लेखनीय कामगिरी, पारितोषिके इत्यादी माहिती कोऱ्या कागदावर शक्य असल्यास आयकार्ड फोटोसह लिहून पाठवावी. ७) विद्यार्थी गुणगौरव योजनेच्या गटातील निकषांनुसार २०१४-२०१५ या वर्षातील गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी/विद्यार्थिनींनी माहिती पाठवावी.

**गट पहिला** - ४ थी व ७ वी च्या स्कॉलरशिप परीक्षेत यश मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी (स्कॉलरशिप परीक्षेच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक.)

**गट दुसरा** - ५ वी ते ९ वी पर्यंतच्या वार्षिक परीक्षेत सर्व तुकड्यांत प्रथम क्रमांक मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी. मुख्याध्यापकांचे प्रमाणपत्र व गुणपत्रिकेची सत्यप्रत जोडणे आवश्यक.

**गट तिसरा** - दहावीच्या शालांत परीक्षेत ८०% किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी (शालांत परीक्षा मंडळाच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक.)

**गट चौथा** - १० वी च्या शालांत परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवून यशस्वी होणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी (शालांत परीक्षा मंडळाच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत जोडणे आवश्यक) (श्रीमती प्रियंवदा श्रीपाद भिडे, प्रभादेवी, मुंबई कै. श्रीपाद सखाराम भिडे यांचे स्मरणार्थ)

**गट पाचवा** - १२ वी च्या परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवून यशस्वी होणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी (उच्च माध्यमिक शालांत परीक्षा मंडळाच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत जोडणे आवश्यक) डॉ. सौ. शुभदा चारुचंद्र भिडे, सांगली (कै. के. वि. तथा दादूकाका भिडे, सांगली यांचे स्मरणार्थ)

**गट सहावा** - १२ वी च्या परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवून यशस्वी होणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी (उच्च माध्यमिक शालांत परीक्षा मंडळाच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत जोडणे आवश्यक) श्रीमती मंजिरी माधव भिडे, पुणे पुरस्कृत (कै. माधव उर्फ नंदू दत्तात्रय भिडे, माभळे, स्मरणार्थ)

**गट सातवा** - १२ वीच्या परीक्षेत शास्त्र शाखेत ८०% किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणारे, कला शाखेत ६०% किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणारे आणि वाणिज्य शाखेत ७५% किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी. (उच्च माध्यमिक शालांत परीक्षा मंडळाच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत जोडणे आवश्यक.)

**गट आठवा** - १० वी च्या शालांत परीक्षेत मराठी विषयात सर्वाधिक गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी. श्री. बळवंत दत्तात्रय भिडे, आमळनेर (कै. सिंधू विनायक भिडे यांचे स्मरणार्थ) (शालांत परीक्षा मंडळाच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक.)

**गट नववा** - १० वीच्या शालांत परीक्षेत संस्कृत विषयात सर्वाधिक गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी. श्री. जनार्दन कृष्णाजी भिडे विलेपार्ले, मुंबई पुरस्कृत. (शालांत परीक्षा मंडळाच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक.)

**गट दहावा** - १० वीच्या शालांत परीक्षेत इंग्रजी विषयात सर्वाधिक गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी. (सौ. स्नेहा रमेश आपटे (भिडे) पुरस्कृत, त्यांचे वडील (कै. दत्तात्रय विनायक भिडे अमळनेर यांचे स्मरणार्थ) (शालांत परीक्षा मंडळाच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक.)

**गट अकरावा** - संगीत, नृत्य, नाट्य, गायन, वक्तृत्व आणि क्रीडा अशा विषयात विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनी. सदर प्राविण्य कुठल्या स्तरावर मिळविले आहे याची माहिती व प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

**गट बारावा** - विद्यार्थी/विद्यार्थिनींसाठी मदत योजना. इरावती ट्रस्ट, दादर, मुंबई यांच्या प्रमुख सुमित्रा मधुसुदन भिडे यांनी कै. त्रिंबक राजेश्वर भिडे आणि कै. जानकीबाई त्रिंबक भिडे यांच्या स्मरणार्थ पुरस्कृत केलेली विद्यार्थी/विद्यार्थिनींसाठी मदत योजना खालीलप्रमाणे -

आर्थिक परिस्थितीमुळे अडचणीत असलेल्या कोणत्याही गुणवान, अभियांत्रिकी किंवा आर्किटेक्ट शाखेत शिक्षण घेत असलेल्या, भिडे कुलातील विद्यार्थी/विद्यार्थिनीला दरवर्षी साहाय्य देण्यासाठी पारितोषिक/मदतीची योजना आहे.

**गट तेरावा** - श्री. प्रदीप वासुदेव भिडे व डॉ. शीला प्रदीप भिडे दिल्ली पुरस्कृत गरजू व गुणवत्ताप्राप्त शालेय अथवा महाविद्यालयीन विद्यार्थी/विद्यार्थिनींसाठी विनापरतफेड विशेष आर्थिक मदत आहे.

*****

**७५ वर्षे किंवा त्यावरील सत्कारार्थी ज्येष्ठ कुलबंधू/भगिनी/माहेरवाशिणींनी फोटोसह माहिती पाठवावी.**

## नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान

**पुणे कार्यालय :** ९२, शुक्रवार पेठ,
रंजन को-ऑप, हौसिंग सोसायटी,
मंडई गणपतीजवळ, पुणे ४११००२
फोन : दिलीप भिडे, मो. ९६५७५४१२३६

## • पत्रव्यवहारासाठी पत्ता •

**ले. क. सुनिल वासुदेव भिडे**
१४२६, सदाशिव पेठ, निलसदन, ए-२०१,
पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०.
मो. ९६२३०१७४४४

'प्राजक्त' हे पत्र मुद्रक सौ. विनीता प्रफुल्ल डबीर यांनी प्रकाशक व मालक श्री. प्रफुल्ल गणेश डबीर यांचेसाठी प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, २८७ 'डी' वॉर्ड, कसबा गेट-गंगावेश रोड, कोल्हापूर-४१६०१२ येथे छापून तेथेच प्रसिद्ध केले. संपादक : प्रफुल्ल डबीर
RNI No. : M-6 (1457)/70-RNI
Reg. No. GR/RNP/KLP 136/15-17 Posted in Kolhapur RMS

साप्ताहिक प्राजक्त
२८७, 'डी' वॉर्ड, कसबा गेट
गंगावेस रोड, कोल्हापूर.
फोन नं. ०२३१-२५४०४२७


# BHIDE & SONS PVT. LTD.

**AN ISO 9001 : 2000 COMPANY**

**Head Office :** Timber Area, Shivajinagar [N], Sangli-416 416 Mah. [INDIA] **Tel. :** +91-233-2375011 **Fax :** +91-233-2376804
**Pune Unit :** T-145, M.I.D.C Bhosari, Pune-26. **Cell. :** 9225 8181 25 **E-mail :** bhidesons@yahoo.co.in

## AGRICULTURE & GARDEN WASTE RECYCLING MACHINES

**CHIPPER SHREDDER CS-33**



Power Require : 5 to 10 H.P.
Output Capacity : 500 Kg / hr.
Engine Driven Model also available

**CHIPPER SHREDDER CS-50**



Power Require : 15 to 20 H.P.
Output Capacity : 1 Tonn / hr.
Motor Driven & Engine Driven Model also available

**CHIPPER C-80**



Power Require : 25 to 30 H.P.
Output Capacity : 3 Tonn / hr.
Motor Driven Model also available


**CHAFF CUTTER**



Power Require : 2 H.P./ 3 H.P. / 5 H.P.
Output Capacity : 200 Kg / hr., 400 Kg / hr., 900 Kg / hr.
Motor driven & Engine Driven Model also available

## INDUSTRIAL PRODUCTS

**PISTON VALVES**
**(FOR STEAM-LINE)**



IBR & Non IBR Piston Valve
Class 150, Class 300 & PN 40
Size 15 mm to 150 mm

**HIGH PRESSURE RECIPROCATING PUMPS (POWER PUMP)**



Pressure - From 30 kg/cm² to 300 kg/cm²
Application - Chemical Injection, Cleaning Drainage Pipes, Boiler feed etc.

**CASTINGS**



Heavy C.I. Castings
Maximum single piece - 2 Tonn

**S.G.IRON FOR AUTO COMPONENTS**



Castings :
Steel, Stainless Steel & S.G. Iron
Range - From 1 kg. To 100 kg.

**LADDLE**



Foundry Crane Laddles
Capacity : Upto 20 Ton